# प्रस्तावना

## वेद विद्येचे माहेर, तीर्थ तयाचे सार
## वात पित्त कफावर सूक्ष्म उपचार

आधुनिक काळात जीवन गतिमान झाले. माणसाची दिनचर्याही बदलली. त्याच बरोबर आरोग्याच्या समस्याही वाढल्या. वनस्पतींचे तीर्थ घेणे, यज्ञातील भस्म लावणे, वनस्पतींची पूजा करणे, प्रदक्षिणा घालणे, गंध लावणे, अशा कृतींमधून पूर्वी नकळत सूक्ष्म उपचार होत असत. घरात आजी असायची, ती घरगुती औषधे देऊन बारीक-सारीक तक्रारी घरच्या घरी बऱ्या करीत असे. वेळच्या वेळी उपचार झाल्याने रोग बळावत नसे. आज आम्ही बारीक सारीक तक्रारींकडे चक्क दुर्लक्ष करतो आणि मग दुष्टचक्रात अडकतो.

घरगुती सौम्य औषधोपचार हाच खरा निरामय आयुष्याचा आधार आहे, हे लक्षात आल्यावर त्यासाठी उपयुक्त औषधे बनविण्याचा ध्यास कै. वैद्य मामा महाजन यांनी १९५०च्या सुमारास घेतला. घरगुती उपचारासाठीची औषधे ही स्वत:ला घेता आली पाहिजेत. सल्ल्याशिवाय स्वत: औषधे घ्यायची असतील तर ती दुष्परिणामांपासून मुक्त, घेण्यास सोपी, बहुगुणी आणि परवडणारी असली पाहिजेत. या चतु:सूत्रीच्या आधारे 'आगोम' औषधींची निर्मिती करण्यात आली.

वात, पित्त, कफ अशा लक्षणांवर आधारित उपचार असल्याने औषधे स्वत:ला घेता येतात. औषधे सूक्ष्म असल्याने प्रमाण कमी अधिक झाले तरी घाबरण्याचे काही कारणच नाही.

तुळस, बेल, दुर्वा, वड व पिंपळ यासारख्या नियमित वापरातल्या सौम्य तरीही व्यापक गुणधर्माच्या वनस्पतींपासून औषधे बनविली असल्याने दुष्परिणामांपासून पूर्णत: मुक्ती मिळाली आहे.

गोड गोळ्यांच्या स्वरूपातील आगोमच्या गुटिका घेण्यास सुलभ आहेत. लहान मुलेही आवडीने घेतात.

सूक्ष्मीकरणामुळे सूक्ष्म स्त्रोतोगामी होऊन शरिरात चटकन मिसळतात. योग्य जागी प्रभाव पडल्याने पटकन गुणही देतात.

निर्मिती प्रक्रिया सोपी झाल्यामुळे किंमतही कमी होते. म्हणूनच उत्तम दर्जाची आगोमची औषधे, सामान्यांना परवडण्यासारखी आहेत.

वनस्पती अत्यल्प प्रमाणात लागल्याने दुर्मिळ वनस्पतींची बचत होते आणि पर्यावरणाचेही रक्षण होते. अशी ही आगोमची अल्पमोली बहुगुणी औषधे घराघरात पोचली आहेत. आपला उद्देश सफल केल्याने लोकप्रिय झाली आहेत.

आजही आगोमची औषधे ह्याच चतु:सुत्रीच्या आधारे ग्राहकांच्या सेवेत सदैव तत्पर आहेत. आगोमची घरचा वैद्य ही पुस्तिका वाचून आपण स्वत: आपल्या कुटुंबाचे आरोग्य रक्षक व्हावे. आरोग्य हीच खरी धनसंपदा आहे. वेळच्या वेळी घरच्या घरी आगोम औषधींचा वापर करून आपले कुटुंब सुखी समृध्द व्हावे, हीच श्री धन्वंतरी चरणी प्रार्थना !

**आता नको काढे नको मात्रा चूर्ण**
**आगोम औषधींवर हवा विश्वास पूर्ण**

# संस्थापकांचे मनोगत

## शुभारंभ

वैद्यकीची आवड व लोकांच्या सतत उपयोगी पडावे ही भावना, याचा स्वाभाविक परिणाम म्हणून गावात प्रथमोपचारी औषधे देत असे. पुढे विद्यार्थी वसतिगृह चालविण्याची कामगिरी आली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर औषधोपचार करावे लागत. विविध अनुभव मिळाले. जबाबदारीने उपचार करावे लागल्याने आत्मविश्वास आला.

निरनिराळ्या पध्दतीची औषधे वापरून पाहिली. पण प्रत्येकात काहीतरी अडचण भासे. अत्यंत साधी, सोपी व मुख्यत्वेकरून पूर्णपणे निर्दोष-कोणताही अपाय न करणारी अशी औषधे पाहिजेत असा विचार केला. औषधांचे मूलद्रव्य हे अन्नाच्याच स्वरूपातील पाहिजे, ते विषस्वरूप वा शरीराला अपायकारक अशा पदार्थांपासून बनविलेले असू नये, या दृष्टीने विचार सुरू झाले.

निरनिराळ्या पध्दतींचा अभ्यास करताना डॉ. कुळकर्णी यांचे पुस्तक (Electro Homoeopathy) वाचनात आले. ही औषधे केवळ वनस्पतींपासून केलेली असतात हे समजले. नंतर डॉ. घोष यांचे पुस्तक (Drugs of Hindusthan) मिळाले, त्याच्या अभ्यासाने प्रयत्नाला दिशा मिळाली.

## सूक्ष्मतेतील गुणधर्म

वनस्पतींचे गुणधर्म आयुर्वेदाने सांगितलेले आहेत किंवा आपल्या नित्याच्या अनुभवांतून आपणांस माहीत आहेत. अडुळसा-कफनाशक, गुळवेल-ज्वरनाशक इ. या वनस्पतींची सूक्ष्म-आगम पध्दतीने औषधे (गोळ्या) बनविली तर त्यांचे तेच गुणधर्म (उदा. अडुळसा-कफनाशक, गुळवेल-ज्वरनाशक) सूक्ष्म स्वरूपातही मिळतात हा विलक्षण सिध्दांत समजला.

## सुयोग्य संगम

होमिओ पध्दतीची सर्व औषधे गोड गोळ्यांच्या स्वरूपात असल्याने घेण्यास सोपी असतात, पण ते शास्त्र अत्यंत किचकट, चिकित्सा पध्दती अत्यंत कठीण आहे. वात-पित्त-कफ या त्रिदोषांवर आधारलेली आपली आयुर्वेदिक पध्दती सोपी, आपल्या परिचयाची पण कडू काढे, मात्रा उगाळणे यामुळे गैरसोयीची. सूक्ष्मतेतही तेच गुणधर्म मिळतात या सिध्दांताने आयुर्वेदिक औषधांच्या गोड गोळ्या बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले.

## आगाम पध्दती – म्हणजेच सूक्ष्म आयुर्वेद

आयुर्वेदीय पाठाप्रमाणे वनस्पती घेऊन आगम पध्दतीने त्याची औषधेबनविणे हीच आमच्या औषधांची गुरूकिल्ली होय. प्रथम एकेक वनस्पती घेऊन तिच्या गोळ्या करून गुणधर्म पाहिले, चांगला अनुभव आला. पुढे पाठातील सर्व वनस्पती घेऊन त्यांच्या गोळ्या बनविल्या. पाठाप्रमाणे त्यांचेही गुणधर्म मिळाले. आयुर्वेदाचे कडू काढे, गोड गोळ्यांच्या स्वरूपात तयार करण्यात यश मिळाले.

## प्रथमोपचार

औषधे बनविताना घरगुती प्रथमोपचार हीच दृष्टी ठेवलेली आहे. त्यामुळे औषधे सौम्य आहेत..वापरलेल्या वनस्पती या आपल्या नित्याचे कार्यात वापरल्या जाणाऱ्या, आपल्या किंवा जनावरांच्या खाण्यात येणाऱ्या अशाच आहेत. विषारी नाहीत. त्यामुळे ही औषधे कमीजास्त वा चुकीने वापरली गेली, गोड गोळ्या समजून मुलांनी खाल्ली तरी काहीही अपाय होत नाही.

## सर्वश्रेष्ठ गुणवैशिष्ट्य

पूर्णपणे निरूपद्रवी, कोणताही अपाय, दुष्परिणाम (Reaction, side-effect) न करणारी औषधे हेच आमच्या औषधांचे सर्वश्रेष्ठ गुणवैशिष्ट्य होय.

## मर्यादा

घरगुती प्रथमोपचार हीच दृष्टी असल्याने औषधे अत्यंत सौम्य आहेत..सोबत दिलेल्या निरनिराळ्या विकारांवर घरगुती प्रथमोपचार एवढीच यांची अपेक्षा आहे. वेळीच उपचार झाले तर विकार बळावत नाही..शरीराला फारच कमी मदत पुरते. ती वेळीच मिळणे हेच महत्त्वाचे असते.

रोग हत्तीच्या पायाने येतो व मुंगीच्या पायाने जातो असे म्हणतात ; पण रोग मुंगीच्याच चोरपावलाने येत असतो. आपणास समजत नाही. आपण बारीक विकार, मरगळ इत्यादी अंगावर काढतो. दुर्लक्ष होते, यातूनच पुढे मोठे विकार उद्भवतात. माता–भगिनी आपले दुखणे सांगण्यास व औषधे घेण्यास कंटाळा करतात व दुखणी अंगावर काढतात,यातूनच पुढे विकार बळावतात. घरीच औषधे असली की मनुष्य सहजी घेतो व पुढील अनर्थ टळतात. वेळ–पैसा यांची बचत होऊन क्लेशही कमी होतात. आमची सूक्ष्म औषधे ही गरज समर्थपणे पूर्ण करतात.

## प्रभावी बाह्योपचार

औषधे आपण पोटात घेतो. त्याचप्रमाणे अर्क विकृत भागी बाहेरून चोळल्यास त्वचेच्या रंध्रातून शरीरात शोषले जातात.

त्याचमुळे सूचिका भरणाप्रमाणे ( इंजेक्शन ) त्वरित गुण येतो. ती इंद्रिये सबळ बनतात. यासाठी बाह्योपचारार्थ समानधर्मी–तैलार्क सिध्द केले आहेत.

## बहुगुणी औषधे

शारीरिक विकृतीचे मूळ वात-पित्त-कफ या त्रिदोषांत कुठेतरी असते. त्याचे बाह्य आविष्कार हे निरनिराळे दिसले, तरी मूळ विकृती वरील पैकी तीन तत्त्वांत असते. त्यामुळे निरनिराळ्या भासणाऱ्या विकृती ज्यांचे मूळ एका तत्त्वांत असते, जसे ताप, कावीळ, कडकी, लघवीचे विकार इत्यादींचे मूळ पित्त या विकारात असते. अशांवर एकच औषध उपयुक्त ठरू शकते. हाच अनुभव महिलांचे बाबतीत येतो. स्त्रीत्व निदर्शक अशी जी शरीरातील यंत्रणा व ग्रंथी तिला मदत करण्याचे कार्य काही वनस्पती करतात. मग ती मासिक पाळी असो किंवा त्याचीच पुढील पायरी, गर्भधारणा असो या सर्व भावनांवर काही वनस्पती चांगले कार्य करतात. त्यामुळे या विकारांवर एकच औषध असू शकते.निरनिराळ्या भासणाऱ्या विकारांवर एकच औषध असण्यामागचे हे रहस्य आहे. त्यामुळे गोंधळून संशय येण्याचे कारण नाही. प्रत्यक्ष अनुभव घेतल्यावर याची खात्री पटते.

## कॉम्प्युटर

आपले शरीर हा परमेश्वराने निर्माण केलेला एक स्वयंप्रज्ञ कॉम्प्युटर आहे. आपले शरीर नीट राखण्यासाठी तो सदैव प्रयत्नशील असतो. त्याच्या प्रयत्नात त्याला थोडी मदत करणे एवढेच आपले काम रहाते.

## वेदकालीन सिध्दांत

पदार्थाच्या सूक्ष्मतेतील गुणधर्माचे ज्ञान भारतीयांना वेदकालापासून आहे, त्याचा व्यवहारात वापर केल्याची अनेक उदाहरणे दिसतात. औषधी वनस्पतींचा मानवाचे आरोग्यरक्षण व वर्धन यासाठी वापर करण्याची पध्दती ही याच गोष्टीची निदर्शक आहे. तुळस, दुर्वा, बेल, उंबर, माका, अडुळसा या वनस्पतींचा अशा सूक्ष्म स्वरूपात वापर केलेला आहे. पिंपळ, तुळस यांना प्रदक्षिणा घालण्यात हीच जाण प्रत्ययास येते. या वनस्पतींचे आसमंत हे त्यांच्या सूक्ष्म द्रव्यांनी भारलेले असते, त्यात त्यांचे गुणधर्मही असतातच. आपल्या शरीरशुध्दीसाठी ते पुरेसे असतात. यावरून सूक्ष्मतेतील गुणधर्माची जाण सिध्द होते.

## प्रदक्षिणा

मनुष्य वाटेने चालत गेला की त्या मार्गावर त्या माणसाच्या शरीरातील त्याच्या वासाची गुणधर्माची सूक्ष्म द्रव्ये बाहेर पडत असतात. ती जड असल्याने २४ तासांपर्यत त्या ठिकाणी रहातात म्हणून कुत्रा त्या वासावरून मार्ग शोधतो. त्याचप्रमाणे प्रत्येक वनस्पती, पदार्थ, प्राणी त्यांच्या/तिच्या गुणधर्माची सूक्ष्म द्रव्ये आसमंतात पसरवीत असतात. ही जाणीव नसती व केवळ मोकळी हवा व व्यायाम हा हेतू प्रदक्षिणा घालण्यामागे असता तर कोणत्याही वनस्पतीला (आंबा, झेंडू) प्रदक्षिणा घालण्यात आल्या असत्या. पण तसे नसून प्रदक्षिणा घालण्यासाठी तुळस, पिंपळ यांसारख्या व्यापक गुणधर्माच्या वनस्पतींची योजना आहे.

## यज्ञ

यज्ञातील समिधा हे याचेच उदाहरण आहे. रूई, पळस, खैर, आघाडा, पिंपळ, उंबर, शमी, दुर्वा या वनस्पती समिधा म्हणून यज्ञात हवन केल्या जातात. या अत्यंत व्यापक गुणधर्माच्या वनस्पतींच्या धुराने सर्व आसमंत भारून जातो व त्यातील सूक्ष्म द्रव्याने मानवाची शरीरे शुध्द होतात. यज्ञांतील विभूती (रक्षा) अंगाला लावण्यात त्यातील औषधी गुणधर्माचीच जाण दिसते.

## तीर्थ

बेल, तुळस, दुर्वा देवाला वाहून त्यावर अभिषेक करून ते पाणी तीर्थ म्हणून घेणे. रूद्राक्षाचा मणी  गळ्यात बांधून त्यावरील पाणी अंगावर घेणे, तांब्याचे भांडे पवित्र मानून त्यातून पाणी पिणे. या प्रथांमध्ये सूक्ष्मतेतील गुणधर्माची जाण प्रत्ययास येते.

आपले मनोबल वाढवून जीवनशक्तीला सूक्ष्म रूपाने सहाय्य करून आपली जीवनशक्ती वृध्दिंगत करण्याच्या कामी सूक्ष्मौषधेच योग्य आहेत. आपल्या जीवनातील रूढींच्या मागचा अर्थ जाणणे आवश्यक आहे. अंधश्रध्दा म्हणून त्या रूढी त्याज्य ठरू नयेत.

## सर्वेसन्तु निरामया: ।

वेळीच घरगुती सौम्य उपचार हाच निरामय आयुष्याचा मार्ग होय.

प्रत्येक जण आपलीच पध्दती सर्वश्रेष्ठ व परिपूर्ण आहे असे मानतो. प्रत्येक पध्दतीत तिचे असे काही वैशिष्ट्य - चांगलेपण, असतेच तसेच उणेपण ही असतेच. यासाठी कोणत्याही एका पध्दतीचा अभिनिवेश न धरता निरनिराळ्या पध्दतीतील आपणांस मानवणारा भाग स्वीकारून प्रत्येकाने आपले आरोग्य निरामय राखावे.

सर्वगुणसंपन्न, साधी-सोपी, निरूपद्रवी पण प्रभावी अशी आमची औषधे घरच्या घरी वापरून आमच्या ग्राहकांना निरामय आयुष्य लाभो; हेच पसायदान आम्हास लाभो ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

**कै. वैद्य श्री. गो. महाजन**
सूक्ष्म आयुर्वेदाचे प्रणते

**|| न वैद्यः प्रभुरायुषः ||**

# आगोमची औषध योजना

**१.अग्निमांद्य : अरूची,भूक न लागणे,** जेवणापूर्वी सुमारे १५ मिनिटे **आगोम** ४ गुटिका घ्याव्या. जेवणानंतर **पचनसुधा** ४ गुटिका पाण्याबरोबर घ्याव्या, **बलवर्धिनी** तेल पोटाला जिरवावे.

**२.अजीर्ण, अपचन : पचनसुधा** ४ गुटिका जेवणानंतर १५/२० मिनिटांनी पाण्याबरोबर घेणे. **बलवर्धिनी** तेल पोटाला जिरवावे.

**३.अत्त्यार्तव / पाळीचा त्रास : महिलामृत** ४ गुटिका रोज ४ वेळा घेणे. **महिलामृत** तेल ओटीपोटाला रोज जिरवणे. पाळी सुरू असताना जास्त (वेळी ८ / ८) गुटिका घ्याव्या व तेलाचा वापर करावा. (ओटीपोट म्हणजे पोटाचा बेंबीखालचा भाग )

**४.अंग, कंबर, पाठ दुखणे / धरणे : आगोम** ४ गुटिका ४ वेळा घेणे. **आगोम** तेल तयार करून मालिश करावे. हळुवारपणे जिरवावे.

**५.अतिसार, हगवण, जुलाब :** प्रत्येक जुलाबानंतर अथवा दर अर्ध्या तासाने **पचनसुधा** ४ गुटिका पाण्याबरोबर घ्याव्या. विकार तीव्र असेल तर जोडीला **आगोम** व **सुशमा** २/२ गुटिका घ्याव्या. **बलवर्धिनी** तेल पोटाला जिरवावे. पाणी भरपूर प्यावे.

**६. अर्धशिषी : नस्यामृतचा** एक एक थेंब दोनही नाकपुड्यात टाकणे, तीव्रता अधिक असल्यास दिवसातून दोन वेळा टाकणे.

**७.आमांश : पचनसुधा** व **कृमीना** प्रत्येकी ४ गुटिका दर जुलाबानंतर पाण्याबरोबर घेणे. **बलवर्धिनी** तेल पोटाला जिरवावे. वर्षभर इलाज केल्यास आमांश बरा होऊ शकतो.

**८.आवाज बसणे : रामबाण** व **आगोम** २/२ गुटिका दर अर्ध्या तासाने घ्याव्या. **आगोम** तेल गळ्याला बाहेरून लावावे. **निरामय तीर्थाच्या** पाण्याने गुळण्या कराव्यात.

**९.आमवात :** सांधे धरणे-दुखणे. जेवणापूर्वी १५ मिनिटे **आगोम** ४ गुटिका नुसत्या घ्याव्या. जेवणानंतर **पचनसुधा** ४ गुटिका पाण्याबरोबर घ्याव्या. **वातनाशक** तेल विकृत भागी, बेंबीवर व पाठीचे कण्याला जिरवावे. ताप असल्यास गुटीका **शमा** २ गुटिका दोनदा पाण्याबरोबर घ्याव्या भूक वाढेल पण आहार वाढवू नये.गरम पाणी प्यावे.

**१०.आम्लपित्त लक्षणे :** डोके दुखणे, घशाशी आंबट येणे. जेवणापूर्वी **आगोम** ४ गुटिका घेणे. जेवणानंतर **पचनसुधा** ४ गुटिका घ्याव्या.

जेवताना अत्याधिक पाणी, तुरडाळ, आंबट, गोड व पित्तकारक पदार्थ वर्ज्य करावे. **शमा** ४ गुटिका रोज ३ वेळा घ्याव्या, **शमा** तेल शिंपीपोटाला जिरवणे. (शिंपी पोट म्हणजे बेंबीच्या वरचे पोट)

**११.इसब–गजकर्ण :** रोज **सुशमा** ४ गुटिका २ वेळा घेणे. **सुशमा** मलम लावावे. विकार बरा झाल्यानंतरही सहा महिने उपचार करावा.

**१२.उचकी : रामबाण** व **आगोम** २/२ गुटिका दर पंधरा मिनिटानंतर देणे. **बलवर्धिनी** तेल पोटाला जिरवावे.

**१३.उन्हाळे : रामबाण** व **शमा** २/२ गुटिका दर पंधरा मिनिटांनी भरपूर पाण्याबरोबर घ्याव्या. **शमा** तेल सर्व पोटाला व पाठीच्या कण्याला जिरवावे. उन्हाळ्याचा त्रास होणाऱ्यांनी रोज उठल्यावर **शमा** ४ गुटिका पाण्याबरोबर घेणे. त्रास होणार नाही.

**१४. उसण : आगोम** तेल बेंबी व कमरेला जिरवणे, **रामबाण** व **आगोम** २ गुटिका रोज ४ वेळा घ्याव्या.

**१५.ओकारी : पचनसुधा** २ व **शमा** २ गुटिका प्रत्येक ओकारी नंतर घ्याव्या. तोंडाशी फेस येत असेल तर **पचनसुधाच्या** जोडीला **आगोम** गुटिका घ्याव्यात. पोटात विषारी पदार्थ गेला असल्यास **पचनसुधाचे** जोडीला **सुशमा** गुटिका देणे

**१६.कफ दाटणे : कफना** ४ गुटिका २ वेळा घेणे व **कफना** तेल सर्व छातीला व घशाला जिरवणे.

**१७.कडकी : शमा** व **रामबाण** ४/४ गुटिका ४ वेळा घेणे. **शमा** तेल शिंपीपोटाला जिरवणे.

**१८.कापणे, भाजणे, जखम, मुकामार : आगोम** तेल लावावे. जरूर तर कापसाची घडी तेलात भिजवून बांधणे,रक्तस्त्राव तात्काळ थांबेल.

**१९.कान फुटणे–दुखणे :** कान पुसून त्यात **आगोम** तेल घालावे. २ **रामबाण** गुटिका ४ वेळा घेणे. कानासाठी तेल एंरडेल तेलात तयार करावे.

**२०.कावीळ :** जेवणापूर्वी **आगोम** ४ गुटिका नुसत्या घ्याव्या. जेवणानंतर **पचनसुधा** ४ गुटिका पाण्याबरोबर घ्याव्या. **शमा** ४ गुटिका भरपूर पाण्याबरोबर रोज ३ वेळा घ्याव्या. **शमा** तेल शिंपी पोटाला जिरवावे. पाणी भरपूर प्यावे.

**२१.कुरूप,भोवरी :** (कॉर्न) दुखरा भाग जरा भिजवून तासावा. **आगोम** तेल त्यावर जिरवावे व तेलघडी शक्यतो बांधून ठेवावी. त्यावर **निरामयचे** थेंब टाकावे.

**२२.केस गळणे : केशरंजना** तेल लावावे. पोटात **केशरंजना** ४ गुटिका २ वेळा घ्याव्या. दोरीवरच्या उड्या माराव्या, तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यावे. नखावर नखे घासावी. **केशरंजना** तेलाचा वास घ्यावा.

२३.**कांजिण्या : रामबाण** व **सुशमा** २/२ गुटिका ३ वेळा घेणे. **सुशमा** मलम लावणे.

२४. **कोंडा : कोंडाना** जल रोज २ वेळा केसांच्या मुळांशी हलक्या हाताने लावावे.

२५. **खर पडणे :** जेवणापूर्वी **आगोम** ४ गुटिका व नंतर **रामबाण** ४ गुटिका घेणे. **बलवर्धिनी** तेल सर्व पोटाला जिरवणे.

२६.**खरूज : सुशमा** ४ गुटिका रोज ३ वेळा घेणे. **सुशमा** मलम लावणे. रोज एक वेळ **आगोम** तेल लावणे.

२७.**खोकला–ओला : कफना** व **आगोम** ४/४ गुटिका रोज घेणे. **कफना** तेल सर्व छाती, पाठ, बरगड्या, गळा यांना जिरवावे.

२८.**खोकला–सुका : कफना** व **रामबाण** ४/४ गुटिका रोज घ्याव्या. **शमा** तेल सर्व छाती, पाठ, बरगड्या, गळा यांना जिरवावे.

२९.**गालगुंड : आगोमची** तेलाची घडी घालावी किंवा जिरवावे. **रामबाण** व **आगोम** ४/४ गुटिका रोज ३ वेळा घ्याव्या. **निरामय तीर्थ** पाण्यात टाकून त्याने गुळण्या कराव्यात.

३०.**गोवर : कफना** व **शमा** ४/४ गुटिका रोज ३ वेळा घ्याव्या. **कफना** तेल सर्व छातीला जिरवावे. या विकारात खोकल्यालाच फार जपावे लागते. गोवर येऊन जाते. खोकल्यानेच मुले हैराण होतात.

३१.**घसा धरणे, दुखणे : रामबाण** ४ गुटिका २ वेळा घ्याव्या. **आगोम** तेल घशाला जिरवावे. सर्दी कफाने दुखत असल्यास **कफना** तेल लावणे. **कफना** गुटिका घ्याव्या. **निरामय तीर्थच्या** पाण्याने गुळण्या कराव्यात.

३२.**चिखल्या :** पाय पुसून **सुशमा** मलम लावावे.

३३.**जाळवात :** पाय ओला करून **सुशमा** मलम लावावे. पोटात **सुशमा** व **पचनसुधा** गुटिका घ्याव्या. पोटाला **बलवर्धिनी** तेल जिरवावे.

३४.**जीर्णज्वर : शमा, सुषमा** व **रामबाण** ४/४ गुटिका अर्धा लीटर पाण्यात विरघळवून ते पाणी दिवसभर थोडे थोडे घ्यावे. **शमा** तेल शिंपीपोटाला जिरवावे.

३५.**झोप न लागणे :** रात्री झोपण्यापूर्वी **केशरंजना** तेल तळपाय व डोक्याला (टाळू ) चोळून लावावे.

३६.**टॉन्सील्स :** जेवणापूर्वी **आगोम** ४ गुटिका व नंतर **रामबाण** ४ गुटिका घ्याव्या. **आगोम** तेल बाहेरून जिरवावे. अपचन, जागरण इत्यादी टाळावे. **निरामय तीर्थच्या** पाण्याने गुळण्या कराव्यात.

३७.**डोके दुखणे (पित्ताने) : शमा** व **रामबाण** २/२ गुटिका अर्धा तासाने घ्याव्या. **शमा** तेल डोके, कपाळ, आखांना जिरवणे. (सर्दीने असल्यास) **कफना** व **आगोम** २/२ गुटिका घ्याव्या. **कफना** तेल डोके, कपाळ, आखांना जिरवणे.

**३८.डोहाळे :** प्रत्येक वेळी ४ ते २० **महिलामृत** गुटिका (तीव्रतेनुसार) ४ ते ५ वेळा भरपूर पाण्याबरोबर घ्याव्या. **महिलामृत** व **बलवर्धिनी** तेल आळीपाळीने पोटाला जिरवणे. **सुबला** ४ गुटिका कपभर दुधाबरोबर दिवसातून २ वेळा घ्याव्या.

**३९.ताप साधा : शमा** व **रामबाण** ४/४ गुटिका रोज ३ वेळा घ्याव्या. **शमा** तेल शिंपी पोटाला जिरवावे.

**४०.तारूण्य पिटिका : निरामय तीर्थाचे** ४ थेंब १०० मिली पाण्यात टाकून ते पाणी चेहऱ्याला दिवसभर थोडे थोडे लावावे. तसेच पाणी पोटातही घ्यावे. पिटिकांचे डागही राहणार नाहीत.

**४१.दमा :** दमेकऱ्याने **कफना** २ गुटिका रोज ४ वेळा भरपूर पाण्याबरोबर घ्याव्या. **कफना** तेल वापरावे. दम्याची धाप लागली असता **कफना** व **आगोम** २/२ गुटिका दर १५ मिनिटांनी पाण्याबरोबर घ्याव्या. **कफना** तेल छाती पाठ बरगड्यांना सारखे लावावे. मोठ्या माणसांचा त्रास कमी होतो, लहान मुलांचा दमा बरा होऊ शकतो.

**४२.दात येण्याचा त्रास : बलदा** ४ गुटिका रोज २ वेळा द्याव्या.

**४३. दात दुखणे : सुदंती** जलाचे ४ थेंब अर्धेभांडे पाण्यात मिसळून त्या पाण्याने गुळण्या कराव्यात. दाढ किडली असल्यास **सुदंतीने** कापूस भिजवून भरून ठेवावा.

**४४.दातांचे आरोग्य :** दात दुखणे, हलणे यावर उपाय म्हणून **सुदंती** पावडरने रोज दात घासावे व हिरडयांना चोळावे.

**४५.नाक चोंदणे, नाकातील हाड वाढणे : कफना** व **आगोम** तेल १/१ थेंब आळीपाळीने नाकात घालावे.

**४६. पडसे–सर्दी : कफना** व **आगोम** ४/४ गुटिका घ्याव्या. **कफना** तेल कपाळ, डोके, गळा, छाती यांना जिरवणे, नाकात २/२ थेंब टाकावे.

**४७.पाय फुटणे :** पाय ओले करून **सुशमा** मलम लावावे. पोटात **पचनसुधा** गुटिका घ्याव्या, पोटाला **बलवर्धिनी** तेल लावावे.

**४८.पोट दुखणे : पचनसुधा** २ गुटिका दर १५ मिनिटांनी द्याव्या. जरूर तर २/२ **सुशमा** गुटिका देणे. **बलवर्धिनी** तेल पोटाला जिरवावे.

**४९.पित्त (शीत) : शमा** व **सुशमा** ४/४ गुटिका रोज ३ वेळा घ्याव्या किंवा गोळ्यांचे पाणी प्यावे. अंगावरील गांधीना **सुशमा** मलम लावणे. **पित्त : शमा** १०–१२ गुटिका १ लीटर पाण्यात विरघळवून ते पाणी दिवसभर थोडे थोडे प्यावे.

**५०.पोटात वात धरणे : पचनसुधा** व **आगोम** २/२ गुटिका १५ मिनि. घ्याव्या.

**५१.प्रसव वेदना : महिलामृत** ८ ते १० गुटिका दर १५ मिनिटांनी द्याव्या. शक्य झाल्यास **महिलामृत** व **बलवर्धिनी** तेल पोटावर ओतून हलक्या हाताने जिरवावे.

**५२.बाळकडू : रामबाण** २/४ गुटिका रोज २ वेळा देणे.

**५३.भोवळ : शमा** व **आगोम** ४/४ गुटिका घ्याव्या किंवा पाणी द्यावे. **शमा** तेल कपाळ व शिंपी पोटाला जिरवावे.

**५४.मरगळ (हात पाय मरगळणे) : रामबाण** व **आगोम** २/२ गुटिका रोज ३/४ वेळा घ्याव्या. नेहमी गरम पाणी प्यावे. झोपताना ओवा खावा.

**५५.मुंग्या येणे :** जेवणापूर्वी **आगोम** व नंतर **पचनसुधा** ४ गुटिका घ्याव्या. **आगोम** तेल पाठीचा कणा, पोटावर बेंबीभोवती, मुंग्या येतात त्या भागाला लावावे.

**५६.मूळव्याध :** शौचानंतर **आगोम** तेलाचा बोळा गुदामध्ये भरून ठेवावा. **सुशमा** मलम लावावे. **सुखदा** ४ गुटिका २ वेळा घ्याव्या.

**५७.माती खाणे : बलदा** २ गुटिका २/३ वेळा द्याव्या.

**५८.मेदोरोग :** (स्थूलपणा) उठल्यावर **चपला** ४/६ गुटिका पाण्याबरोबर घ्याव्या. **चपला** तेल रात्री निजताना व स्नानापूर्वी बेंबीवर भरपूर ओतून सर्व पोटाला व पाठीच्या कण्याला जिरवणे.

**वि. सू.** आहार वाढवू नये. कमी करण्याची आवश्यकता नाही. तेल जिरवणे हा प्रमुख उपचार आहे. अशक्तपणा न येता हलके वाटते. गुटिका केवळ सहाय्यक आहेत.

**५९.लघवी अडणे ; थेंब थेंब होणे : रामबाण** व **शमा** २/२ गुटिका दर पंधरा मिनिटांनी भरपूर पाण्याबरोबर घ्याव्या. **शमा** तेल सर्व पोटाला व पाठीच्या कण्याला जिरवावे. उन्हाळ्याचा त्रास होणाऱ्यांनी रोज उठल्यावर **शमा** ४ गुटिका पाण्याबरोबर घेणे. त्रास होणार नाही.

**६०.लाळ गळणे : रामबाण** २ गुटिका रोज ३ वेळा देणे.

**६१.सांधेदुखी : संधीशोधना** ४ गुटिका २ वेळा घ्याव्या. **वातनाशक** तेल दुखऱ्या सांध्याला आणि पाठीच्या कण्याला २-३ वेळा जिरवावे. आवश्यकता वाटल्यास अधिक वेळा जिरवावे.

**६२. चोचरेपणा : कफना** गुटिका आणि **निरामय तीर्थच्या** पाण्याने गुळण्या कराव्यात व पोटात घ्यावे, तयार **कफना** तेल घश्याला बाहेरून लावावे.

**६३. चाई :** चाई झालेल्या भागावर **चाईना** तेल दिवसातून २-३ वेळा चोळून लावावे.

**६४. कृमी :** गुटिका **कृमीना** ८ ते १० गोळ्या रोज रात्री झोपताना घ्याव्या.

**६५. मुतखडा :** गुटिका **अश्मारी** ८ ते १० गोळ्या १ लीटर पाण्यात टाकून ते पाणी दिवसभर प्यावे. तैलार्क **शमा** पोटाला जिरवावे.

## पचनसुधा गुटिका

या गुटिका कुडा (Holarrhena antidysenterica) 3X; बेल (Aegle marmelos) 3X; हरडा (Terminalia chebula) 3X या वनस्पतींपासून बनविलेल्या आहेत. पचनक्रियेच्या विकारांवर यांचा अप्रतिम उपयोग होतो. पोट दुखणे – फुगणे, हगवण, अमांश, कॉलरा, ओकारी यांवर विकाराचे तीव्रतेनुसार प्रत्येक वेळी २ ते ४ गुटीका १५ मिनिटे ते अर्ध्या तासाचे अंतराने घ्याव्यात. विकाराची तीव्रता ज्या मानाने कमी होईल त्याप्रमाणे गुटिकांचे प्रमाण कमी करावे व मध्यंतर वाढवावे. पित्त असेल व ओकारीत आंबट-कडू घशाशी येत असेल तर याचे जोडीला शमाच्या २-२ गुटिका घ्याव्या. अग्निमांद्य (अपचन, आम्लपित्त, पोट फुगणे, वातविकार) यांवर जेवणापूर्वी सुमारे पंधरा मिनिटे आगोमच्या ४ गुटिका नुसत्या घेऊन जेवणानंतर पचनसुधा ४ गुटिका पाण्याबरोबर घ्याव्यात. कॉलरा, विषबाधा यामुळे होणाऱ्या उलट्या व जुलाब यासाठी याच्या जोडीला सुशमा गुटिका या गुटिकां इतक्याच घ्याव्यात.

## बलवर्धिनी तैलार्क

हा तैलार्क कुडा (Holarrhena antidysenterica) 3X; बेल (Aegle marmelos) 3X; हरडा (Terminalia chebula) 3X या वनस्पतींपासून बनविलेला आहे. सोबतची अर्काची बाटली हलवून १० मिली तैलार्क १०० मिली खोबरेल तेलात ओतून ५ मिनिटे गदगदून हलवावे. हे तेल अंतरेंद्रियांच्या स्नायुंची शक्ती वाढविणारे आहे. पोटाच्या विकारात गुटिका पचनसुधाच्या जोडीला याचा बाह्योपचार करावा. आतड्यांना सूज आली असेल, ती अशक्त झाली असतील तर पोटाला हलक्या हाताने ५-६ महिने जिरवावे. गर्भाशयाची नीट वाढ झालेली नसेल वा ती अशक्त असल्याने गर्भपात होत असेल तर ओटीपोटाला हलक्या हाताने जिरवावे. गर्भाशयाची नीट वाढ होईल. हृदय अशक्त असेल तर छातीवर जिरवावे, उत्तम उपयोग होईल. अंतरेंद्रियाचे स्नायूंना आलेली शिथिलता व अशक्तपणा याने जातो. यात सुबला अर्क मिसळून लावला तर अधिक उपयोग होतो. या तेलाचा आणखी एक अकल्पित उपयोग होतो. याने केसातील उवा-लिखा मरतात. त्यासाठी गुटिका बलदा पोटात घ्याव्या.

## कफना गुटिका

या गुटिका अडुळसा (Adhatoda vasica) 3X; कोरफड (Aloe barbadensis) 3X या वनस्पतींपासून बनविलेल्या आहेत. यांचा उपयोग पडसे, सर्दी, साधा व डांग्या खोकला, दमा, कफ, क्षय, इन्फ्ल्युएंझा, गोवर, न्यूमोनिया इ. विकारांवर होतो. सामान्यपणे वरील विकारांत प्रत्येक वेळी ४-४ गुटिका याप्रमाणे दिवसातून ८-१० गुटिका पाण्याबरोबर घ्याव्या.विकार तीव्र

व दु:सह असेल तर प्रत्येक वेळी जास्त गोळ्या वरचेवर घ्याव्या व जोडीला आगोमच्या तितक्याच गुटिका घ्याव्या. दम्याची धाप लागली असता कफना व आगोमच्या प्रत्येकी २  गुटिका दर १५ मिनिटांनी पाण्याबरोबर घ्याव्या. दमा नसताना दमेकऱ्याने रोज ४-४ गुटिका २ वेळा घ्याव्या. दम्यात तैलार्क कफनाचा उपयोग अत्यावश्यक असतो. इन्फ्ल्युएंझा, न्युमोनियाचे तापांत व इतर तापांत सर्दी खोकला असेल तर शमा गुटिका जोडीला घ्याव्या. गोवर या विकारावर गोवर बरे झाल्यानंतरही खोकल्याने मुले हैराण होतात. याचसाठी प्रथमपासून शमा गुटिका बरोबर याच्या २-२ गुटिका घ्याव्या. याच्या जोडीला कफना तेलाचा वापर केल्यास त्वरित आराम मिळतो.

## कफना तैलार्क

हा तैलार्क अडुळसा (Adhatoda vasica) 3X; कोरफड (Aloe barbadensis) 3X या वनस्पतींपासून बनविलेला आहे. अर्काची बाटली हलवून १० मिली तैलार्क १०० मिली  खोबरेल तेलात ओतून गदगदून हलवावे. गुटिका कफनाचे जोडीला याचा बाह्योपचार आवश्यक असतो. गुण तात्काळ जाणवतो. साधा व डांग्याखोकला, कफ दाटणे, दमा लागणे, कफक्षय, न्युमोनिया, इ. विकारांत सर्व छाती, बरगड्या, पाठ यांना भरपूर तेल घेऊन हलक्या हाताने जिरवावे. कफ सुटून बरे वाटेल. सर्दीने डोके दुखत असल्यास कपाळ, डोके इत्यादींना जिरवावे.

## शमा गुटिका

या गुटिका गुळवेल (Tinospora cordifolia) 3X; म्हाका (Eclipta alba) 3X; उंबर (Ficus glomarata) 3X या वनस्पतींपासून बनविल्या आहेत. साधा व दोषी ताप, कडकी, गोवर, कांजिण्या, कावीळ, पित्तविकार, जीर्णज्वर, लघवीचे विकार यावर उत्तम उपयोग होतो. वरील विकारात सामान्यपणे ४-४ गुटिका याप्रमाणे रोज ४ वेळा पाण्याबरोबर घ्याव्या. तापात याचे जोडीला रामबाण २-२ गुटिका दिल्यास इतर विकृती होत नाहीत. न्युमोनिआ, गोवर यात याचे जोडीला कफनाच्या २-२ गुटिका घ्याव्या. टायफॉइड, क्षयाचा ताप इ. दोषी तापांत याच्या जोडीला सुशमाच्या २-२ गुटिका घ्याव्या. आम्लपित्त, कावीळ यात याचे जोडीला जेवणापूर्वी १५ मिनिटे आगोम व नंतर पचनसुधा ४-४ गुटिका घ्याव्या. पित्ताने अंगावर गांधी उठणे, खाज सुटणे, डोके दुखणे यात याच्या जोडीला रामबाण २-२ गुटिका घ्याव्या. लघवी अडणे, थेंब थेंब होणे, त्रास होणे इत्यादी लघवीच्या विकारांत याच्या व रामबाणच्या २-२ गुटिका १५ मिनिटांनी भरपूर पाण्याबरोबर घ्याव्या. लहान मुलांचे यकृत बिघडून (लिव्हर डल होणे), वरचेवर ताप येणे, शौचास पांढरे होणे यात याचे जोडीला रामबाण २-२ गुटिका घ्याव्या. पित्ताचे ओकारीत पचनसुधाबरोबर याच्या गुटिका घ्याव्या, याचे जोडीला तैलार्क शमाचा उपयोग अत्यावश्यक असतो.

## शमा तैलार्क

हा तैलार्क गुळवेल (Tinospora cordifolia) 3X; म्हाका (Eclipta alba) 3X; उंबर (Ficus glomarata) 3X या वनस्पतींपासून बनविला आहे. सोबतची अर्काची बाटली हलवून १० मिली तैलार्क १०० मिली खोबरेल तेलात ओतून तेल पाच मिनिटे गदगदून हलवावे. गुटिका शमाच्या जोडीला याचा बाह्योपचार अत्यावश्यक असतो. तात्काळ गुण दिसतो. ताप भरल्यास याची घडी कपाळावर घालावी. ताप उतरून वात होणार नाही. ताप, कावीळ, पित्तविकार, यकृत, प्लीहेचे बिघाड, लहान मुलांना शौचास पांढरे होणे, वरचेवर ताप येणे, आकडी - फीट येणे यांत शिंपी पोटाला जिरवावे. पित्ताने डोके दुखत असल्यास कपाळ, डोके यांना जिरवावे. उन्हाळे, लघ्वी अडणे, थेंब थेंब होणे या लघ्वीच्या विकारात सर्व पोट व पोटाचा मागचा भाग यांना जिरवावे.

## आगोम गुटिका

या गुटिका भल्लातक (Semicarpus anacardium) 3X; तूंबा (Leucas cephalotes) 3X या वनस्पतींपासून बनविलेल्या आहेत. या गुटिका वातावर वस्ताद असून अन्य औषधांना गती देणाऱ्या, अंगात उष्णता निर्माण करणाऱ्या आहेत. आमवात, पोटात वात धरणे, हात-पाय वळणे, मुंग्या येणे, कमर-पाठ दुखणे, अग्निमांद्य, अपचन, आम्लपित्त, कावीळ यावर जेवणापूर्वी सुमारे १५ मिनिटे ४-४ गुटिका नुसत्या घ्याव्या. तापावर व अन्य वेळी वात झाल्यास, हिवताप, थंडी असल्यास फार अशक्तपणा येऊन हात-पाय गार पडल्यास, दम्याची धाप लागली असता याच्या ४-४ गुटिका १०-१५ मिनिटांनी घ्याव्या. ओकारीत तोंडात फेस आला असता गुटिका पचनसुधाच्या जोडीला आगोमच्या ४-४ गुटिका घ्याव्या.

## आगोम तैलार्क

हा तैलार्क भल्लातक (Semicarpus anacardium) 3X; तूंबा (Leucas cephalotes) 3X वनस्पतींपासून बनविलेला आहे. अर्काची बाटली हलवून १० मिली तैलार्क १०० मिली खाबरेल तेलात मिसळून गदगदून हलवावी. वात विकारात याचा अप्रतिम उपयोग होतो. उसण, हात-पाय वळणे, मुंग्या येणे, हात व पाय गार पडणे, कमर, पाठ दुखणे, यावर विकृत भागी हलक्या हाताने जिरवावे तसेच पाठीच्या कण्यालाही हलक्या हाताने जिरवावे किंवा कापूस भिजवून घडी घालावी. मुका मार, ठेचणे, कापणे, मुरगळणे, लचकणे, भाजणे, जखम, गळू, कोणत्याही ठिकाणचा ठणका यावर लावावे किंवा घडी घालावी. कान फुटला असल्यास कान पुसून कानात घालावे, चांगला उपयोग होतो. जखम होऊन रक्तस्त्राव होत असल्यास कापूस भिजवून घडी ठेवावी व बांधावी. तात्काळ रक्तस्त्राव थांबतो. पायाच्या भोवऱ्या, कुरूप (कॉर्न) भिजवून तासून त्यावर तेलाची घडी बांधावी व जिरवावे, भोवऱ्या पूर्ण बऱ्या होतात. बैलांचे खांद, चट्टे बरे होतात. बैल कामाला धरून चालतो. गायी-म्हशींची ओटी सुजल्यास त्यावर अप्रतिम उपयोग होतो.

## रामबाण गुटिका

या गुटिका तुळस (Ocimum sanctum) 3X; बेल (Aegle marmelos) 3X; अडुळसा (Adhatoda vasica) 3X; हरडा (Terminalia chebula) 3X या वनस्पतींपासून केलेल्या आहेत. लहान मुलांना बाळकडू म्हणून रोज याच्या दोन गोळ्या द्याव्या. जरूर तर २-३ वेळाही २-२ गोळ्या द्याव्या. बालक पूर्ण निरोगी राहून त्याची उत्तम वाढ होईल. मूल केव्हाही अस्वस्थ झाल्यास, पोट फुगल्यास याच्या ४-४ गोळ्या १५ मिनिटांनी द्याव्या. दूध पाजताच ओकारी होत असल्यास दूध पाजण्यापूर्वी याच्या २-२ गोळ्या द्याव्या. त्यानेही ओकारी न थांबल्यास याच्या जोडीला आगोमच्या २ गोळ्या द्याव्या. अनेक विकारात याचा सहाय्यक औषध म्हणून उपयोग होऊन इतर विकृति निर्माण होत नाहीत. केव्हाही मरगळ वाटल्यास आगोमबरोबर याच्या २-२ गोळ्या १५ मिनिटांनी २-३ वेळा द्याव्या. डोके पित्ताने दुखत असल्यास गुटिका शमाबरोबर याच्या २-२ गोळ्या द्याव्या. सर्दी वा अन्य कशामुळे डोके दुखत असल्यास गुटिका कफनाबरोबर २-२ गोळ्या द्याव्या.

## महिलामृत गुटिका

या गुटिका अशोक (Jenosia ashoka) 3X; जास्वंद (Hibiscus rosa sinensis) 3X; अडुळसा (Adhatoda vasica) 3X; हरडा (Terminalia chebula) 3X या वनस्पतींपासून बनविलेल्या आहेत. स्त्रियांच्या आरोग्यासाठी हे रामबाण औषध आहे. अनियमित मासिक पाळी, विटाळ कमीजास्त जाणे, पाळीचे वेळी पोटात दुखणे यावर रोज ४ गुटिका ४ वेळा पाण्याबरोबर घ्याव्या. गर्भवतीला तर यासारखा मित्र नाही. डोहाळ्याचा त्रास होत असेल तर विकाराच्या तीव्रतेप्रमाणे प्रत्येक वेळी ४ ते २० गुटिका दर तासाने पाण्याबरोबर घ्याव्या. गरोदरपणी पोट दुखू लागल्यास याच्या ८-८ गुटिका घ्याव्या. इतर कारणाने पोट दुखत असेल तर तेही थांबेल व योग्य वेळेला सुलभ प्रसूती होईल. या विकारात तेलाचा उपयोग अत्यंत चांगला होतो. तेल वापरणे आवश्यक आहे. डोहाळे हा विकार किंवा रोग नव्हे, शरीरात होणारे बदल व गर्भवाढीसाठी आवश्यक असणारे द्रव्य याची कमतरता यांचा अविष्कार असतो. गोळ्यांचा अंतर्गत व तैलार्क महिलामृतचा बाह्योपचार तसेच सुबला ४ गुटिका दुधाबरोबर घ्याव्या, म्हणजे खात्रीने सुखरूपता मिळेल.

## महिलामृत तैलार्क

हा तैलार्क अशोक (Jenosia ashoka) 3X; जास्वंद (Hibiscus rosa sinensis) 3X; अडुळसा (Adhatoda vasica) 3X या वनस्पतींपासून बनविलेला आहे. सोबतची अर्काची बाटली हलवून १० मिली तैलार्क १०० मिली खोबरेल तेलात ओतून तेल ५ मिनिटे गदगदून हलवावे. मासिक पाळीच्या विकारात गुटिका महिलामृतच्या जोडीला याचा बाह्योपचार करावा. ओटीपोटास हलक्या हाताने जिरवावे. तात्काळ बरे वाटेल. गर्भाशयाच्या अशक्तपणात, गुटिका व तैलार्क महिलामृतच्या जोडीला तेल बलवर्धिनी जिरवावे लागते.

## चपला गुटिका

या गुटिका गुग्गुळ (Commiphera mukul) 3X; चित्रक (Plumbago zeylanica) 3X या वनस्पतींपासून बनविल्या आहेत. अंगातील जाड्याचे हरण करून चापल्य निर्माण करणारे हे औषध आहे. आपल्या अन्नाचे रूपांतर सात धातूंत योग्य न होता मेद धातूचे पोषण अधिक होते त्यामुळे अस्थि मज्जा, शुक्र धातूची वाढ योग्य होत नाही व वाढलेली चरबी शरीरात साठवली जाऊन अनंत रोगांचे उगमस्थान बनते. आपल्या बेंबीच्या मागे असलेले मणिपूर हे चक्र कार्यप्रवण झाल्यास ही विकृती दूर होते. आसनांनी हे साध्य होते पण आसने करणे अशक्य असल्यास औषधी उपचारांनी हेच साध्य होते, असा अनुभव आहे. उठल्यावर तोंड धुवून चपलाच्या ४-५ गुटिका पाण्याबरोबर घ्याव्या. रात्री झोपतांना व स्नानापूर्वी तेल चपला बेंबीवर भरपूर ओतून पोटाला जिरवावे. शरीरातील चरबी कमी होऊ लागून उपचार सुरू केल्यापासून १०/१२ दिवसांतच हलके वाटू लागते. काही वेळा शरीरात पाणी साठलेले असते. अशा वेळी लघवी वा घामाच्या रूपाने ते बाहेर पडल्याने लघवीला जास्त होते किंवा फार घाम येतो. शरीरात सर्दीही साठलेली असण्याची शक्याता असते. अशा वेळी औषधे सुरू केल्यावर सर्दी होऊन नाकाला धार लागते. अशा वेळी न घाबरता किंवा सर्दी बंद करण्यासाठी औषध न घेता सर्दी जाऊ द्यावी. तात्काळ हलके वाटते. शरीरात जमा झालेली अनावश्यक द्रव्ये शरीरातून बाहेर जाणे आवश्यक असते, ते काम हे औषध चांगल्या प्रकारे करते. या उपचारांनी अशक्तपणा तर येत नाहीच, उलट उत्साह व कार्यशक्ती वाढून स्थूलपणा जातो, हेच याचे सर्वश्रेष्ठ वैशिष्ठ्य होय.

## चपला तैलार्क, तेल

हा तैलार्क गुग्गुळ (Commiphera mukul) 3X; चित्रक (Plumbago zeylanica) 3X या वनस्पतींपासून बनविला आहे. अर्काची बाटली हलवून १० मिली तैलार्क १०० मिली खाबरेल तेलात मिसळून गदगदून हलवावी. मेदोरोग, स्थूलता,जाड्य या विकारांवर हे प्रधान औषध आहे. रात्री निजताना व स्नानापूर्वी बेंबीवर भरपूर तेल ओतून ते हलक्या हाताने सर्व पोटाला १०-१५ मिनिटे जिरवावे. १०-१२ दिवसांतच हलके वाटून उत्साह वाटेल. तेल पाठीच्या कण्याला पण जिरवावे. या विकारांत या तेलाचा वापर हा प्रधान उपचार असून गुटिका दुय्यम आहेत.

## सुशमा गुटिका

या गुटिका पारिजात (Nyctanthus arburtristis) 3X; तुळस (Ocimum sanctum) 3X या वनस्पतींपासून बनविलेल्या आहेत. शरीरात भिनलेली विजातीय द्रव्ये, विष, जंतू यांचे उत्सर्जन करण्याचे कार्य या गुटिका करतात. त्वचा विकारात सुशमा मलमाचा बाह्योपचार चालू असता दिवसातून दोन वेळा ४-४ गुटिका पाण्याबरोबर घ्याव्या. विंचू, फुरसे इ. विषारी प्राण्यांचा दंश झाल्यास २०-२५ गुटिका तांब्याभर पाण्यात विरघळवून त्यातील एक चमचा पाणी अर्धा कप साध्या पाण्याबरोबर दर १५-२० मिनिटांनी द्यावे व हेच गोळ्यांचे पाणी दंश झालेल्या व दुखऱ्या भागाला बाहेरून लावावे व शक्यतर सुशमा मलम हलक्या हाताने लावावे. त्वरीत डॉक्टरांकडे न्यावे. कॉलरा रोगामुळे किंवा पोटात विषबाधा होऊन उलट्या, जुलाब होत असतील तर पचनसुधा गुटिकाच्या जोडीला याच्याही ८-१० गुटिका घ्याव्या. कफक्षयात गुटिका कफना व गुटिका आगोमबरोबर २-२ गुटिका घ्याव्या.

## सुशमा मलम

हे मलम पारिजात (Nyctanthus arburtristis) 3X; तुळस (Ocimum sanctum) 3X या वनस्पतींपासून बनविले आहे. विकाराची जागा पाय, चेहरा इ. धुवून ते भाग ओले असतानाच मलम चोळून लावावे. गजकर्ण, इसब इ. खाज असलेल्या त्वचा विकारांवर अप्रतिम उपयोग होतो. मलम पाच मिनिटे लावल्यावर न झोंबता कंड तात्काळ थांबेल. खाज, कंड थांबणे याचाच अर्थ कीड मरणे होय. पापण्यांची खाज, खुपऱ्या, डोळे येणे यावर डोळ्यात काजळाप्रमाणे घालावे न झोंबता तात्काळ बरे वाटेल. हातापायांना भेगा पडणे, फुटणे, थंडीत ओठ, गाल फुटणे यावर अप्रतिम उपयोग होतो. जाळवात बरा होतो. पायांच्या चिखल्याही बऱ्या होतात. जुनाट तसेच अंगभर विकार असेल तर मलमाच्या जोडीला पोटातून रोज सुशमा ४ गुटिका २ वेळा घ्याव्या. त्वचाविकार पूर्ण बरा झाल्यानंतरही रोज एकदा विकृत भागी मलम ५-६ महिनेपर्यंत लावावे. किडीचे निर्मूलन होण्यासाठी ते आवश्यक असते.

## बलदा गुटिका

या गुटिका वड (Ficus bengalensis) 3X; केळीचे दाते (Bannana shoots) 3X या वनस्पतींपासून बनविलेल्या आहेत. मुलांना दात येताना होणाऱ्या त्रासावर रोज ४-४ प्रमाणे २ वेळा द्याव्या. त्रास अधिक असेल तर गोळ्यांचे प्रमाण वाढवावे. मुले माती खात असतील तर वरीलप्रमाणे गोळ्या द्याव्या.

## केशरंजना गुटिका

या गुटिका ब्राम्ही (Centelia asiatica) 3X; म्हाका (Eclipta alba) 3X; जास्वंद (Hibiscus rosa sinensis) 3X; वड (Ficus bengalensis) 3X; आवळा (Embilica officinalis) 3X या वनस्पतींपासून बनविलेल्या आहेत. केशरंजना तेला बरोबर या गुटिकांचा उपयोग करावा. ४ –४ गुटिका रोज २ वेळा पाण्याबरोबर घ्याव्या. २० ते २५ दिवसांतच केस गळण्याचे कमी होतात. ज्यांचे केस नैसर्गिकच कमी असतात अशांचे केस फार वाढत नाहीत परंतु ज्याचे नैसर्गिक केस भरपूर असून गळून कमी झालेले असतील अशांचे केस चांगले वाढतात. ५/६ महिन्यांत केस वाढत असल्याचे समजेल. केस चांगले वाढण्यास वर्ष दीड वर्ष लागेल. केसांना तेल लावणे अत्यावश्यक असते; त्याचा उत्तम उपयोग होतो. केस काळे, सतेज व मुलायम होतात. पण काही कारणांनी तेल लावणे अशक्यच असेल तर नुसत्या गुटिकांचाही उपयोग होतो असा अनुभव आहे. केसात कोंडा असल्यास कोंडाना डोक्याच्या कातडीला चोळून लावावे. जास्त गुटिका घेऊन हा कालावधी कमी होऊ शकत नाही.

## केशरंजना तैलार्क, तेल

हा तैलार्क ब्राम्ही (Centelia asiatica) 3X; म्हाका (Eclipta alba) 3X; जास्वंद (Hibiscus rosa sinensis) 3X; वड (Ficus bengalensis) 3X; आवळा (Embilica officinalis) 3X या वनस्पतींपासून बनविला आहे. अर्काची बाटली हलवून १० मिली तैलार्क १०० मिली खाबरेल तेलात मिसळून गदगदून हलवावी.

**केशवृध्दी :** तेल सर्व डोक्याला भरपूर चोळून लावावे. विकाराची तीव्रता व जुनाटपणा ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे २०–२५ दिवसांत केस गळण्याचे कमी होईल. गळलेल्या केसाचे जागी नवीन केस येऊन ५/६ महिन्यांत केस वाढले असल्याचे जाणवेल. बारीक खुरटे केस वाढतात. केसांचे मूळ जिवंत असेपर्यंत केस परत येऊ शकतात. कातडीवरील केसांची रंध्रे बंद होऊन कातडी तुळतुळीत झाली असेल तर मात्र उपयोगी नाही. याच तेलाबरोबर केशरजंना गुटिका पोटात घ्याव्यात.

**केसांचे आरोग्य :** नित्य लावल्याने केस पिकण्याचे थांबेल, केस काळे, लांब, सुंदर मुलायम व तुकतुकीत होतात. डोक्यात कोंडा/उवा होत नाहीत.

**शांत झोप :** निजताना डोके व तळपाय यांना लावल्यास शांत झोप येते.

**विशेष उपचार –** तयार केशरंजना तेल रात्री निजण्यापूर्वी दोन्ही नाकपुडीत १–१ थेंब टाकावे. केसांच्या आरोग्य रक्षणासाठी याचा उत्तम उपयोग होतो.

## सुबला गुटिका

या गुटिका बदाम (Prunus amygdalus) 3X; वड (Ficus bengalensis) 3X; दुर्वा (Cynodon dactylon) 3X यांपासून बनविल्या आहेत. कोणताही आजार, बांळतपण इत्यादी कोणत्याही कारणाने अशक्तपणा आलेला असेल तर याचा खुराक ( टॉनिक ) म्हणून उपयोग करावा. रोज सकाळ-संध्याकाळ ४-४ गोळ्या एक कप दुधाबरोबर घ्याव्या. एखादे मूल अंग धरत नसेल तर २-२ गोळ्या कपभर दुधातून रोज दोन वेळा द्याव्या.

## सुबला तैलार्क

या तैलार्कामध्ये बदाम (Prunus amygdalus) 3X; वड (Ficus bengalensis) 3X; दुर्वा (Cynodon dactylon) 3X हे घटक आहेत. मूल अंग धरत नसेल तर गुटिका सुबलाबरोबर याचा बाह्योपचार करावा. १० मिली अर्क हलवून १०० मिली तेलात मिसळून वापरावा. खोबरेल तेल वापरावे पण एरंडेल तेल वापरल्यास त्याचा अधिक उपयोग होतो, असा अनुभव आहे. तेव्हा शक्यतो एरंडेल तेलातच बनवावे. त्याने स्नायू चांगले पुष्ट होतात. ज्या मुलींचे स्तन अविकसित-लहान असतील त्यांनी आपल्या स्तनांना जिरविल्यास त्यांची वाढ होऊन पुष्ट होतात. पुरूषांचे इंद्रिय दुर्बल झाले असल्यास त्यास जिरवावे. इंद्रिय पुष्ट व टणक बनते असा अनुभव आहे. वीर्य स्थीर होण्यासाठी उपयोग होतो. स्तंभना गुटिकांचा वापर करताना या तेलाचा वापर अवश्य करावा. उत्तम उपयोग होतो. केवळ या तेलाचा उपयोग सुध्दा पुरेसा असतो.

## स्तंभना गुटिका

या गुटिका कडुनिंब (Azadiracta indica) 3X; शेवरी (Bombax mulabaricum) 3X; वड (Ficus bengalensis) 3X या वनस्पतींपासून बनविल्या आहेत. वीर्य घट्ट होण्यास याचा चांगला उपयोग होतो. तरूण वयात स्वप्नदोषाचा फार त्रास होत असेल त्यावेळी या ४-४ गोळ्या रोज दोन वेळा पाण्याबरोबर घ्याव्या. वीर्य पातळ झाल्याने लवकर पतन होत असेल त्यावेळी या गोळ्यांचा चांगला उपयोग होतो. वीर्य घट्ट झाल्याने लवकर पतन होत नाही. या गोळ्यांचा वापर करताना इंद्रियाला बाहेरून सुबला तेल जिरवणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे इंद्रिय धष्टपुष्ट बनून त्याची वीर्य धरून ठेवण्याची ताकद वाढते.

## पयदा गुटिका

या गुटिका दुधवेल (Asparagus racemosus) 3X या वनस्पतीपासून बनविल्या आहेत. या गुटिका खास करून बाळंतिणीसाठी उपयुक्त आहेत. ४ गोळ्या १ कप दुधाबरोबर रोज दोन वेळा घेतल्याने माता आपल्या बाळांना अंगावर अधिक दूध पाजू शकतात. आजकाल लहान मुलांना बाहेरचे दूध किंवा बेबीफूड देण्याची फॅ शन आहे. विशेषत: नोकरी करणाऱ्यांची हीच समस्या आहे. लहान मुलांना निदान ४ महिने तरी मातेचे दूध मिळणे आवश्यक असते. जागतिक आरोग्य संघटना पण हेच सांगतात. ज्या प्रमाणे सिगारेट पाकिटावर 'आरोग्यास अपायकारक' असे छापलेले असते. त्याप्रमाणे बेबीफूड डब्यावर 'लहान मुलांना अपायकारक' असे लिहिणे आवश्यक आहे. तसेच लहान मुलांना अपायकारक औषधे देऊ नये.

आपल्या मुलांच्या प्रकृतीची काळजी मातांनीच घ्यायची असते व त्यासाठी आपल्या बाळांना अंगावर पाजणे भविष्यकाळात फायदेशीर ठरते.

## गवांबु गुटिका

या गुटिका रानांत चरणाऱ्या तरूण गायीच्या गोमुत्रापासून (Gomutra) 3X बनविलेल्या आहेत. ज्या विकृतींत गोमूत्र घेण्यास सांगितले जाते त्यावेळी गोमूत्राऐवजी या ४-४ गोळ्या रोज तीन वेळा पाण्याबरोबर घ्याव्यात. गोमूत्र प्राशनाने होणारे सुपरिणाम या गोळ्यांनी होतात. गोमूत्र हे बलवर्धक, स्मृतिवर्धक, कफ-वातनाशक इत्यादी गुणांनी युक्त असते. हनुवटी, कंठ, मुख, डोळे, भुवई यातील विकारांवर सांगितलेले आहे. तसेच पोटांतील अनेक विकारांवर उपयुक्त असल्याचे लिहिले आहे. ताजे गोमुत्र उपलब्ध होत नाही त्यामुळे या गुटिका वरदान ठरतात.

## कृष्णकेशा गुटिका

या गुटिका म्हाका (Eclipta alba) 3X; आवळा (Embilica offininalis) 3X; मेंदी (Lawsonia inermis) 3X; ब्राम्ही (Centelia asiatica) 3X या वनस्पतींपासून बनविल्या आहेत. या गुटिका अपायरहित आहेत. या गुटिकांबरोबर तैलार्क कृष्णकेशा वापरणे अत्यावश्यक आहे. या औषध उपचाराने कलपाप्रमाणे तात्काळ गुण जाणवणार नाही. या औषधाचा उपयोग सहा महिने ते दोन वर्षांमध्ये जाणवतो. प्रकृतीमान व तरूण वयात गुण लवकर जाणवतो. औषध उपचार सुरू केल्यावर प्रथम केसांना तांबूस छटा जाणवते हे सुचिन्हच आहे. केस अधिक प्रमाणात पिकलेले असल्यास रोज चार गोळ्या दोन वेळा घ्याव्यात. अन्यथा रोज दोन गोळ्या दोन वेळा घ्याव्यात. गोळ्या खाताना हाताळू नयेत. गोळ्या नियमित घेणे आवश्यक आहे. औषधाचा उपयोग झाल्यानंतरही गोळ्या नियमित घेणे आवश्यक आहे. अशा वेळी रोज फक्त दोन गोळ्या घ्याव्यात.

## कृष्णकेशा तैलार्क

हा तैलार्क म्हाका (Eclipta alba) 3X; आवळा (Embilica offininalis) 3X; मेंदी (Lawsonia inermis) 3X; ब्राम्ही (Centelia asiatica) 3X या वनस्पतींपासून बनविलेला आहे. हे तेल अपायरहित आहे. तेल तयार करण्यापूर्वी तैलार्काची बाटली गदगदून हलवावी. एका वेळी १० मिली. तैलार्क १०० मिली. खोबरेल तेलात मिसळावा व केसांना लावण्यापूर्वी गदगदा हलवावा. कृष्णकेशा तैलार्का बरोबर कृष्णकेशा गुटिका वापरणे अत्यावश्यक आहे. या तेलाने कलपाप्रमाणे त्वरित गुण जाणवणार नाही. औषधाचा गुण जाणवण्यास सहा महिने ते दोन वर्षांपर्यंत कालावधी लागतो.

**वापरण्याची रीत** – तयार केलेले तेल डाव्या तळहातावर घेऊन उजव्या हाताच्या बोटांनी सर्व केसांना व डोक्याच्या कातडीला चोळून लावावे. तेल लावून झाल्यावर किमान दोन तास केस धुवू नये. रात्री झोपताना तेल लावल्यास अधिक उत्तम तसेच झोपताना तेल तळपायालाही जिरविल्यास शांत व गाढ झोप लागते.

**विशेष उपचार –** तयार कृष्णकेशा तेल रात्री निजण्यापूर्वी दोन्ही नाकपुडीत १–१ थेंब टाकावे. केसांच्या आरोग्य रक्षणासाठी याचा उत्तम उपयोग होतो.

## अश्मारी गुटिका

मुतखडा अलिकडे मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. मुतखड्यामुळे मूत्र विसर्जनात अडथळा निर्माण होऊन असह्य वेदना होतात. अश्मारी गुटिका या प्रभावी वनस्पतींपासून बनविल्या आहेत. गोखरू (Tribulas terrestris) 3X; पाषाणभेद (Berjenia ligulata) 3X; पुनर्नवा (Boerhavia diffusa) 3X; कुळिथ (Dolichos bifiorus) 3X; वाळा (Vetiveria zizannioides) 3X या वनस्पतींपासून बनविल्या आहेत. रोज सकाळी तोंड धुतल्यावर अश्मारीच्या ४ गोळ्या खाऊन त्यावर १ भांडे साधे पाणी प्यावे. तसेच ८–१० गोळ्या तांब्याभर पाण्यात विरघळवून ते पाणी थोडे थोडे दिवसभर प्यावे. त्यासोबत साधे पाणीही प्यावे. पाणी भरपूर पिणे आवश्यक आहे. गोळ्या घेणे सुरू केल्यावर १५–२० दिवसांत दु:ख कमी झाल्याचे जाणवेल. किमान सहा महिने तरी नियमित उपचार घ्यावेत. अश्मारी गुटिकाबरोबर शमा तेलाचाही वापर करावा. दुहेरी उपचाराचा फायदा त्वरीत आणि चांगला होतो. शमा तेल शिंपी पोटाला आणि त्याच्या मागील भागाला रोज दोन वेळा लावावे.

## कृमीना गुटिका

वावडिंग (Embelia ribes) 3X; डाळिंब (Punica granatum) 3X; पळस (Butea monsoperma) 3X; निंबू (Citrus acida) 3X; गुळवेल (Tinospora cordifolia) 3X; अर्जुन (Terminalia arjuna) 3X; कुडा (Holarrhena antidysenterica) घेऊन गोळ्या बनविल्या आहेत.

विशेष करून लहान मुलांचे तसेच मोठ्या माणसांचे कृमी, जंत यावर रामबाण व निर्धोक उपचार.

**डोस – वय १–३ वर्षे –** २ गोळ्या रात्री जेवणानंतर १० दिवस.

**वय ४–१० वर्षे –** ४ गोळ्या रात्री जेवणानंतर १० दिवस.

**मोठी माणसे–** ८–१० गोळ्या रात्री जेवणानंतर १० दिवस.

दर तीन महिन्यांनी एकदा उपचार करावा. हे औषध घेतल्यावर पोटात कृमी अथवा जंत असल्यास नक्कीच पडतील. काही वेळा कृमी अतीसूक्ष्म असल्यास दिसत नाही. कृमी लक्षणे – लहान मुलांचे पोट सतत फुगणे, दुखणे, दडदडीत होणे, भूक न लागणे अथवा अती लागणे.सतत बारीक ताप येणे, थोडे थोडे पण भरपूर वेळा संडासला होणे इ.लक्षणे कृमी अथवा जंतांनी होऊ शकतात. वेळीच या औषधांचा वापर करावा. मोठ्या माणसांना गुदद्वाराशी खाज येणे, सतत चुळ सुटणे, सतत बारीक डोके दुखणे, पोट फुगणे, थोडे थोडे संडासला होणे इ. लक्षणे कृमी अथवा जंतांनी होऊ शकतात. अशावेळी त्वरीत या गोळ्या घ्याव्या.

## संधीशोधना गुटिका

या गुटिका निर्गुडी (Vitex nirgundo) 3X; एरंड (Ricinus communis) 3X; रास्ना (Pluchea lanceolata) 3X या वनस्पतींपासून बनविल्या आहेत. संधिवात, आमवात, सांध्यांना सूज इ. वातविकारामधे संधीशोधना ४ गुटिका २ वेळा घ्याव्या. विकाराची तीव्रता कमी झाल्यावर ४ गुटिका एकदाच घ्याव्या.रोज सकाळी एक कप गरम पाणी प्यावे.

## वातनाशक तेल

निरगुडी (Vitex nigundo) 3X; एरंड (Ricinus communis) 3X; रास्ना (Pluchea lanceolata) 3X या वनस्पतींपासून बनविले आहे. हे तेल संधीवात, आमवात, सांधेदुखी, कमरपाठदुखी, इ. वातविकारांवर उपयुक्त आहे. दु:ख असणाऱ्या भागाला दिवसातून ३ वेळा हलक्या हाताने जिरवावे या तेलासोबत संधीशोधना गुटिका पोटात घ्याव्या. रोज सकाळी १ कपभर गरम पाणी प्यावे. गरज असल्यास तेल पुन: पुन: जिरवावे.

## तृणामृत गुटिका

गव्हाच्या ताज्या रोपांपासून (गव्हांकूर Wheat grass) 3X या गुटिका बनविल्या आहेत. गव्हामधे असणाऱ्या हरितद्रव्याचे फायदे या गुटिकांमुळे मिळतात. रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी गव्हांकुर रसाचा उत्तम उपयोग होतो. गव्हांकुरापासून बनविलेल्या गुटिका तृणामृत ४ गोळ्या रोज २ वेळा घ्याव्या.

## सुखदा गुटिका

या गोळ्या सुरण (Amorphophallus capanulutus) 3X; बेल (Aegle marmelos) 3X; हरडा (Terminalia chebula) 3X या वनस्पतींपासून बनविल्या आहेत. या गोळ्या संडासच्या मार्गावर होण्याऱ्या विविध समस्यांवर प्रभाव करते. मूळव्याध, गुदमार्गाच्या ठिकाणी बेचैनी वाटते अशा वेळी या ४ गोळ्या दिवसातून २ वेळा घ्याव्यात. दिवसभर पुरेसे पाणी प्यावे. तिखट, मसालेदार पदार्थ टाळावेत. गुदमार्गाजवळ जास्त शुष्कता (कोरडेपणा) वाटत असल्यास सुशमा मलम लावावे.

## मेहारी गुटिका

या गुटिका बेल (Aegle marmelos) 3X; कडुनिंब (Azadiracta indica) 3X; जांभूळ (Eugenia jamblana) 3X; भावा (Cassia fistula) 3X; बिवळा (Petrocarpus marsupium) 3X या वनस्पतींपासून केलेल्या आहेत. मधुमेह आटोक्यात राहण्यास यांचा उपयोग होतो. रोज ४-४ गोळ्या तीन वेळा पाण्याबरोबर घ्याव्या. (वैद्यकीय सल्ला घ्यावा.)

## अभिसारी गुटिका

या गुटिका तुळस (Ocimum sanctum) 3X; सर्पगंधा (Rauwolfia serpentina) 3X या वनस्पतींपासून केलेल्या आहेत. रक्ताभिसरणात वाताने अडथळा येऊन रक्तदाब वाढतो. त्याप्रमाणे रक्तवाहिन्या जाड होणे किंवा शिथिल होणे हेही कारण असते. रुधिराभिसरणातील वाताची अडचण दूर करणे व रक्तवाहिन्या समर्थ बनविणे हेच दोन्ही प्रकारच्या रक्तदाबावर आवश्यक असते.४-४ गोळ्या रोज चार वेळा पाण्याबरोबर घेतल्यास रक्तदाब आटोक्यात येतो. (वैद्यकीय सल्ला घ्यावा.)

## निरामय तीर्थ (बहुपयोगी द्रव)

भल्लातक (Semicarpus anacardium) 3X; पारिजात (Nyctanthus arburtristis) 3X; तुळस (Ocimum sanctum) 3X या वनस्पतींपासून हे तीर्थ बनविले आहे. रक्तशुध्दी, रक्ताभिसरण, विषबाधा, त्वचाविकार यांवर उपयुक्त. याचे १० थेंब १०० मिली. पाण्यात टाकून ते पाणी २ - २ चमचे ३ वेळा प्यावे व बाहेरून लावावे. कान दुखत असल्यास तीर्थाचा १/१ थेंब टाकावा.

**तारूण्य पीटिका (मुरम्या)**–तीर्थाचे पाणी पोटात घ्यावे व चेहरा स्वच्छ धुवून लावावे. ८/१० दिवसांत परिणाम दिसून येईल. मुरम्यांचे तसेच भाजल्याचे व्रणाचे डागही जातात.

**त्वचा –** त्वचेचा तेलकटपणा जाऊन त्वचा सतेज व कोमल होते.

## सुदंती द्रव

हे औषध गुलाब पाण्यामध्ये तयार केले आहे. यामधे निंब (Azadirata indica) 3X; खदिर (Acacia catechu) 3X; करंज (Pogamia pinnata) 3X; बाभुळ (Acacia arabica) 3X या वनस्पती आहेत. दात दुखणे, दाढ दुखणे, किडणे, पू होणे, हिरड्या सुजणे, रक्त येणे इत्यादी तक्रारींवर याचा उत्तम उपयोग होतो. सुदंतीचे ४-५ थेंब अर्धे भांडे पाण्यात (५० मिली) टाकून त्या पाण्याने गुळण्या कराव्यात तसेच ते पाणी बोटाने हिरड्या दात यांना चोळून लावावे. दु:खाच्या तीव्रते नुसार दिवसातून ८-१० वेळाही उपचार करावा तसेच सुदंती मधे कापुस भिजवून तो बोळा दात अथवा दाढीवर भरून ठेवावा. तात्काळ आराम वाटेल.

## सुदंती पावडर

यामधे निंब (Azadirata indica) 3X; खदिर (Acacia catechu) 3X; करंज (Pogamia pinnata) 3X; बाभुळ (Acacia arabica) 3X या वनस्पती आहेत. रोज दोन वेळा सुदंती पावडरने दात घासून हिरड्यानाही चोळल्यास दातांचे आरोग्य रक्षणसाठी उत्तम उपयोग होतो.

## कोंडाना

हे औषध गुलाब पाण्यामधे तयार केले आहे. यामधे लिंबू (Citrus acida) 3X; कोरफड (Aloe barbadensis) 3X; कडुनिंब (Azadirata indica) 3X या वनस्पती आहेत. डोक्यामधे होणाऱ्या कोंडा वर प्रभावी औषध आहे. प्रथम बाटली हलवून घ्यावी. औषध तळहातावर घेवुन बोटांनी डोक्याच्या कातडीला चोळून लावावे. दिवसातून दोन वेळा लावल्यास चांगला उपयोग होतो. औषध गुलाब पाण्यात तयार केले असल्याने केस धुवावे लागत नाहीत तसेच चेहरा तेलकट होत नाही.

## चाईना तेल

म्हाका (Eclipta alba) 3X; कोरफड (Aloe barbadensis) 3X; जास्वंद (Hibiscus rosa sinensis) 3X या वनस्पतींपासून बनविले आहे. ठराविक भागावरील केस जाऊन त्वचा चकचकीत दिसू लागते. त्याला चाई म्हणतात. चाई असलेल्या भागावर दिवसातून २/३ वेळा चोळून लावावे. २०-२५ दिवसांत फरक जाणवू लागेल.

## नस्यामृत

हे औषध तुळस (Ocimum sanctum) 3X; आघाडा (Achyranthes aspera) 3X या वनस्पतींपासून बनविले आहे. डोकेदुखी, अर्धशिषी, कफ अथवा पित्ताने डोके जड होणे यासाठी याचा वापर करावा. झोपून पाठीखाली उशी घ्यावी. जेणेकरून मान तिरपी होऊन नाकपुड्या वरच्या दिशेने होतील. दोन्ही नाकपुड्यात १-१ थेंब टाकावे आणि ५ मिनीटे तसेच झोपून रहावे. त्रास अधिक असेल तर दिवसातून दोन वेळा वापरावे.